सन २०१७-१८ या वित्तिय वर्षात राष्ट्रीय रुरबन अभियानांतर्गत प्राप्त झालेला केंद्र हिस्सा व त्याअनुषंगाने समरुप राज्य हिस्याचा निधी वितरीत करण्याबाबत .

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः रुरबन-२०१७/प्र.क्र.१२३/योजना-१

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दिनांक : ०३ ऑक्टोंबर २०१७

वाचा :

१) या विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनआरएम २०१६/प्र.क्र.०१/योजना-४ दि.१४ जानेवारी २०१६.
२) या विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनआरएम २०१६/प्र.क्र.१२/योजना-४ दि. ०६ जुलै २०१७.
३) या विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनआरएम २०१७/प्र.क्र.९३/योजना-४ दि. ०७ जुलै २०१७
४) या विभागाचा शासन निर्णय क्रमांक रुरबन २०१७/प्र.क्र.१२१/योजना-४ दि.२२ ऑगस्ट २०१७

शासन निर्णय :

केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय रुरबन अभियान संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यात सुरु करण्यात आलेले आहे. सन २०१७-१८ या वित्तिय वर्षासाठी सदर अभियानांतर्गत पहिल्या टप्पातील ७ गावसमुहांसाठी उणिवा निवारण निधीच्या (CGF) पहिल्या टप्याकरीता केंद्र हिस्सा रक्कम रुपये ३५.१० कोटी व याअनुषंगाने राज्य हिस्सा २३.४० कोटी अशी एकुण रक्कम रुपये ५८.५० कोटी इतक्या निधीची राज्याच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे. त्यापैकी संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये कोषागारातून आहारीत करण्यात आलेला निधी केंद्र हिस्सा रक्कम रुपये २२.२३ कोटी व याअनुषंगाने राज्य हिस्सा रक्कम रुपये १४.८२ कोटी अशी एकुण रक्कम रुपये ३७.०५ कोटी इतका निधी PFMS मार्फत संबंधित जिल्हयांना वितरीत करण्यात आलेला होता. याअनुषंगाने पहिल्या टप्पातील उर्वरीत उणिवा निवारण निधी केंद्र हिस्सा रक्कम रुपये १२.८७ कोटी व याअनुषंगाने राज्य हिस्सा रक्कम रुपये ८.५८ कोटी अशी एकुण रक्कम रुपये २१.४५ कोटी इतका निधी BDS वर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरचा निधी खालील प्रमाणे लेखाशिर्षामधून पहिल्या टप्पातील गावसमुहाच्या विकासासाठी संबंधित जिल्हयांना वितरीत करावा लागणार आहे.

केंद्र हिस्सा		राज्य हिस्सा	
लेखा शिर्ष	वितरीत करावयाची रक्कम	लेखा शिर्ष	वितरीत करावयाची रक्कम
मागणीक्र.एल-३, २५१५, इतर ग्राम विकास कार्यक्रम, १०६, ग्रामिण भागातील नागरी सुविधांसाठी तरतूद, (००) (०१) राष्ट्रीय रुरबन अभियान गावसमुहांचा विकास (केंद्र हिस्सा ६०%), ३३ अर्थसहाय्य, (२५१५२५३९)	१२.८७ कोटी	मागणी क्र.एल-३, २५१५, इतर ग्राम विकास कार्यक्रम, १०६, ग्रामिण भागातील नागरी सुविधांसाठी तरतूद, (००)(०१) राष्ट्रीय रुरबन अभियान गावसमुहांचा विकास (राज्य हिस्सा ४०%), ३३ अर्थसहाय्य, (२५१५२५४८)	८.५८ कोटी

२. याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक ७ जुलै २०१७ अन्वये राज्य व्यवस्थापन कक्ष-रुरबनची स्थापना तसेच, त्याअनुषंगाने पद निर्मितीची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत, वितरीत करण्यात येणा-या निधीसंबंधात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना आहरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. वर नमुद केल्याप्रमाणे केंद्र व राज्य हिस्साची रक्कम रु. २१.४५ कोटी मात्र कोषागरातून आहरीत करणे करिता आहरण अधिकारी यांना अर्थ संकल्पीय वितरण प्रणाली वर उपलब्ध करुन देण्यांत येत आहे. सदरची रक्कम कोषागरातून आहरीत केल्यानंतर या विभागाच्या राष्ट्रीय रुरबन अभियानाच्या राज्यस्तरावर उघडण्यात आलेल्या खालील बचत खात्यात जमा करण्यात यावी.

बेंकेचे नाव व शाखा	खात्याचा क्रमांक	खात्याचे नांव	NEFT/IFSC Code
बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा- मंत्रालय, मुंबई	६०२४२९९०९२४	रुरबन मिशन महाराष्ट्र	MAHB०००१३८८

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक २९०/२०१७/व्यय-१५,दिनांक १३ सप्टेंबर २०१७, २६५/अर्थोपाय, दिनांक १२ जुन २०१७ आणि २५१/अर्थ-१७ दिनांक १८ सप्टेंबर २०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००३१६४७१३४८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2017.10.13 13:11:31 +05'30'

अनिल काळे
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर
३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर
४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा पालघर
५. जियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. वित्त विभाग (व्यय-१५) व (अर्थ -१७) मंत्रालय, मुंबई ४०० ००३२
७. कार्यासन अधिकारी, वित्त-७, वित्त-१, ग्रामविकास व जलसंधारण विभाग.
८. निवडनस्ती.